वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./६६६२/२०२३ दिनांक :- १६/९/२०२३

-: प्रसिध्दीपत्रक :-

**गणेशोत्सव २०२३ निमित्त शिवाजीचौक, केशवनगर पुणे येथील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत**

गणेशोत्सव २०२३, साजरा करण्याकरीता मूर्ती खरेदी करण्यासाठी कुंभारवाडा,केशवनगर येथे बरेच नागरिक त्यांचे वाहनासह येत असतात.त्यामुळे तेथील अरुंद रस्त्यावर वाहतुक कोंडी होत असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **आवश्यकते नुसार दिनांक १९/०९/२०२३ रोजी सकाळी ०६.०० ते २४.०० वा. पर्यत** तात्पुरत्या स्वरुपाचे खालीलप्रमाणे एकेरी वाहतुकीचे आदेश निर्गमित करीत आहे.

एकेरी मार्ग :-

१) छत्रपती शिवाजी महाराज चौक, केशवनगर येथून मांजरीकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी मांजरी रोडने न जाता रेणुका माता मंदीर उजवीकडे वळून मांजरी रोडकडे जावे.
२) गायरान वस्ती येथून मुंढवा चौकाकडे येणाऱ्या वाहनचालकांनी रेणुका माता मंदिर येथून डावीकडे वळून पुढे व्यंकटेश ग्राफिक्स येथून उजवीकडे वळून मुंढवा चौकाकडे जावे.

तरी वाहनचालकांनी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे करण्यात येत आहे.

16/9/2023

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रत :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर